सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक

## (आपत्ती व्यवस्थापन शाखा)

**दुरध्वनी क्र. 0253-2315080/2317151** E-Mail- ddmanashik@gmail.com **फॅक्स क्र.0253- 2581700**

**क्र.कक्ष/ कोरोना विषाणू/136/2020** **नाशिक दिनांक :-23/03/2020**

**वाचा :** 1. आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 चे कलम 30, 33, 34,41 व कलम 51

2. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग, यांचे कडील अधिसूचना क्र. करोना 2020 /प्र.क्र. 58 आरोग्य 5 दिनांक 13 मार्च 2020

3. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग, यांचे कडील अधिसूचना क्र. प्र.क्र. 58 आरोग्य 5 दिनांक 14 मार्च 2020

**<u>आदेश</u>**

ज्या अर्थी, आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील कलम 25 अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे. व त्यातील पोट कलम 2 (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

ज्या अर्थी राज्य शासनाने संदर्भीय 2 अन्वये करोना विषाणूचा ( कोव्हीड 19 ) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू करून खंड 2,3,व 4 मधील तरतुदींची अंमलबजावणीसाठी अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्याबाबतची नियमावली संदर्भीय 3 अन्वये प्रसिद्ध केली आहे आणि जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी घोषित केलेले आहे. त्याबाबतची नियमावली संदर्भीय 2 अन्वये प्रसिद्धी केली आहे आणि जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी घोषित केलेले आहे.

याअनुषंगाने शासनाने वेळोवेळी दिलेले आदेश व या कार्यालयामार्फत वेळोवेळी काढलेले आदेश याबाबतीत वेळोवेळी समन्वय करणे, मार्गदर्शन करणे, अहवाल घेणे आणि त्याअनुषंगीक सर्व कामे करण्यासाठी खालील प्रमाणे अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ.नं | अधिका-यांचे नांव व पदनाम | संपर्क क्रमांक | सोपविण्यात आलेली जबाबदारी |
|---|---|---|---|
| 1 | निलेश सागर,<br>अपर जिल्हाधिकारी, नाशिक | 9422227990 | 1. विविध विभागांनी घेतलेले धोरणात्मक निर्णय क्षेत्रीय यंत्रणा, व्हॉसअॅप/ लघसंदेश / ईमेल इ.द्वारे पाठविणेची सोय करणे.<br>2. शासनाच्या विभागांकडून निर्गमित केलेल्या धोरणात्मक निर्णया संदर्भात क्षेत्रीय स्तरावर संबंधित विभागामार्फत अंमलबजावणी करणे.<br>3. शासनाने घेतलेल्या निर्णया संदर्भात जिल्हयांत होत असलेल्या अंमलबजावणी संदर्भात आढावा घेणे व EOC मध्ये सर्व माहिती दररोज सायंकाळी 5 वाजेपर्यंतअदयावत |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ठेवणे.<br>4. निम्न अधिका-यांकडून प्राप्त होणारे प्रस्ताव, शंका इ.बाबत मार्गदर्शन पर कार्यवाही करणे, समन्वय राखणे. |
| 2. | 1. कुमार आशिर्वाद, सहा.जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, नाशिक<br>2. डॉ अनंत पवार, निवासी वैद्यकीय अधिकारी, जिल्हा रुगणालय, नाशिक | 9871017596<br><br>9881733345 | 1. उपचाराकरीता आवश्यक असलेली विविध साधन व साहित्य यांचे तांत्रिक विनिदेष निश्चित करणे व खरेदीची सर्व उपाययोजना करणे.<br>2. वैद्य.महाविदयालयामधील विद्यार्थ्यांना आवश्यकतेनुसार प्रशिक्षण देणे व त्यांचा आपत्कालीन परिस्थितीमध्ये उपयोग करुन घेणे.<br>3. सेवानिवृत्त तज्ञ व अन्य तांत्रिक वैद्यकीय सेवा संलग्न अधिकारी / कर्मचारी यांची जास्तीत जास्त सेवा उपलब्ध करुन घेण्यासाठी नियोजन करणे. |
| 3. | श्री भागवत डोईफोडे, निवासी उपजिल्हाधिकारी नाशिक | 9423785785 | 1. कार्यालयाचे नियमित प्रशासकीय कामकाज बाधित होऊ न देणे व तातडीचे संदर्भ निकाली काढणे. |
| 4. | अरविंद नर्सीकर, जिल्हा पुरवठा अधिकारी नाशिक | 9403689487 | 1. आपत्कालीन परिस्थितीमध्ये अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तुंचा नियमित स्वरुपात पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी विविध सर्व उपाययोजना करणे. |
| 5. | अरविंद अंतुर्लिकर, उपजिल्हाधिकारी, प्रशासन नाशिक | 9545573109 | 1. विविध स्वयंसेवा संस्था व नागरिकांकडून देऊ केलेल्या मदती बाबत योग्य नियोजन करणे व त्यांचे वितरण योग्य व्यक्तींना व योग्य प्रकारे होईल याची दक्षता घेणे. |
| 6. | श्री प्रकाश थविल, मुख्य कार्यकारी अधिकारी स्मार्ट सिटी, मनपा, नाशिक | 9420735855 | 1. नाशिक महानगरपालिका क्षेत्रामध्ये संभाव्य बाधित रुग्णांसाठी पुरेशी अलगीकरण व्यवस्था यासंदर्भात शासनादेशात नमूद सर्व बाबींच्या पुर्ततेसह करावी. |
| 7. | श्री नितीन कापडणीस, उपायुक्त, मालेगांव महानगरपालिका मालेगांव | 9923014353 | 1. मालेगांव महानगरपालिका क्षेत्रामध्ये संभाव्य बाधित रुग्णांसाठी पुरेशी अलगीकरण व्यवस्था यासंदर्भात शासनादेशात नमूद सर्व बाबींच्या पुर्ततेसह करावी. |
| 8. | श्री देविदास टेकाळे, जिल्हा प्रशासन अधिकारी (न.पा.क्षेत्र) | 9594552157 | 1. सर्व नगरपालिका क्षेत्रामध्ये संभाव्य बाधित रुग्णांसाठी पुरेशी अलगीकरण व्यवस्था यासंदर्भात शासनादेशात नमूद सर्व बाबींच्या पुर्ततेसह करावी. |
| 9. | श्रीमती वैशाली झनकर-वीर, शिक्षणाधिकारी (प्राथ) | 9595333222 | 1. सर्व ग्रामीण क्षेत्रामध्ये संभाव्य बाधित रुग्णांसाठी पुरेशी अलगीकरण व्यवस्था यासंदर्भात शासनादेशात नमूद सर्व बाबींच्या पुर्ततेसह करावी. |
| 10. | श्री नितीन गवळी, प्रादेशिक अधिकारी, म.औ.वि.महामंडळ, नाशिक | 9422410557 | 2. अनुज्ञेय उद्योगधंदे सोशल डिस्टंसिंगचे नियम पाळूनच सुरु राहतील यांची दक्षता घेणे तसेच त्यांना येणा-या अडचणीचे निराकरण करणे. |
| 11. | श्री सतिष भामरे, व्यवस्थापक, जिल्हा उदयोग केंद्र, नाशिक | 9423447112 | 1. प्रभावित झालेल्या उदयोग व्यवसाया समवेत विचार विनियम करुन उपाय योजना करणे व कलम 144 ची प्रभावी अंमलबजावणी करणे. |
| 12. | श्रीमती ज्योती कावरे, उपजिल्हाधिकारी, | 9850089155 | 1. आपत्कालीन परिस्थतीमध्ये शासनाने केलेल्या उपायोजनांची माहिती लोकप्रतिनिधींना देणे. शासनाकडून करावयाच्या |

| | | | |
|---|---|---|---|
| | भूसंपादन, (वैजप्र) नाशिक | | विविध उपपाययोजना संदर्भात लोकप्रतिनिधी यांचेकडून प्राप्त होणा-या सुचनांचे संकलन करणे. |
| 13. | श्री संजीव पडवळ, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, नाशिक | 9422211941 | 1. कृषी व पुरक उद्योगधंदे सोशल डिस्टंसिंगचे नियम पाळूनच सुरु राहतील यांची दक्षता घेणे तसेच त्यांना येणा-या अडचणीचे निराकरण करणे. |
| 14. | श्री दुष्यांत भामरे, सहआयुक्त, औषधे प्रशासन, नाशिक | 9820245816 | 1. औषध निर्मिती व पुरवठा यामध्ये कोणतीही समस्या उदभवणार नाही, साठेबाजी अथवा काळाबाजार होणार नाही तसेच या ठिकाणी सोशल डिस्टंसिंग चे नियम पाळले जातील यांची दक्षता घेणे. |
| 15. | श्री चंद्रशेखर साळुंखे, सहा.आयुक्त अन्न व प्रशासन, नाशिक | 9921226448 | 2. अन्न निर्मिती व पुरवठा यामध्ये कोणतीही समस्या उदभवणार नाही, साठेबाजी अथवा काळाबाजार होणार नाही तसेच या ठिकाणी सोशल डिस्टंसिंग चे नियम पाळले जातील यांची दक्षता घेणे. |
| 15. | श्री निलेश श्रिंगी, उपजिल्हाधिकारी, भूसंपादन,राहर नाशिक | 9552529697 | 1. चेकपोस्ट मॅनेजमेंट व CRPC 144 ची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे. |
| 16. | 1. श्री गौतम बलसाने, जिल्हा उपनिबधंक सहकारी संस्था नाशिक<br>2. अरविंद चतुर्वेद, जिल्हा ॲग्रणी बँक अधिकारी, नाशिक | 9822458130<br>9422284764 | 1. वित्त सेवा सुरळित सुरु राहतील तसेच प्रत्येक ठिकाणी सोशल डिस्टंसिंग चे नियम पाळले जातील यांची दक्षता घ्यावी. |
| 17. | श्री राजेश साळवे, जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी नाशिक | 9422770785 | 1. माहिती व अहवाल संकलीत करणेसाठी सुकर संगणकीय कार्यपध्दती वरील सर्व अधिका-यांना उपलब्ध करुन ठेवणे. तसेच वेळोवेळी अदयावत करणे. |

वर नमूद अधिकारी यांनी वर नमुद विषयान्वये वेळोवेळी केलेल्या कामकाजाचा दैनंदिन अहवाल दररोज सायंकाळी 06.00 वा. जिल्हा आपत्ती कक्षास सादर करावा.

वरील कामे प्रभावीपणे पूर्ण करण्याकरीता उक्त सर्व अधिका-यांना आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकानुसार पूर्वतयारी व प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी **"घटना व्यवस्थापक"** (Incident Manager) म्हणून घोषित करण्यात येत आहे. व आपत्ती व्यवस्थापन कायद्यातील सर्व अधिकारांचा वापर करण्यास प्राधिकृत करणेत येत आहे.

**(सूरज द्वि. मांढरे)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक**

**प्रति:- - -----------------------------------------------------**

**प्रत:-** 1. मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर

2. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई 32 यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.